# ‘हवामान बदल; कृषीवर परिणाम’

## उद्यापासून आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

‘जागतिक हवामान बदल व त्याचे कृषी व जलक्षेत्रावर होणारे परिणाम’ या विषयावर चार कृषी विद्यापीठे, जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था म्हणजेच ‘वाल्मी’ यासह विविध शासकीय, निमशासकीय संस्थांतर्फे गुरुवारपासून तीन दिवस आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आल्याची माहिती परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांनी पत्रपरिषदेत दिली.

वाल्मीच्या सभागृहात १४ ते १६ डिसेंबर दरम्यान तीन दिवस होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात देश-विदेशातील ६०० पेक्षा जास्त हवामान शास्त्रज्ञ, संशोधकांसह विविध तज्ज्ञ सहभागी होणार आहे. गुरुवारी (दि. १४) एमजीएममधील रुक्मिणी सभागृहात सकाळी १० वाजता केंद्रीय नीती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी कृषी अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक डॉ. आर. एस. परोडा, कुलगुरू डॉ. व्यंकटेश्वरलू, राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, दापोलीच्या कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तपस भट्टाचार्य, अकोल्याच्या पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, ‘इक्रीसॅट’चे महासंचालक डॉ. बर्व्हिन सन, वाल्मीचे महासंचालक एच. के. गोसावी, महिकोचे अध्यक्ष राजू बारवाले यांची प्रमुख उपस्थिती राहील.